Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 15 June 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १५ जून २०२५ सकाळी ११.०० वाजता**

****

उत्तराखंडमध्ये रुद्रप्रयागच्या गौरीकुंड परिसरातील खरक पर्वतीय प्रदेशात आज पहाटे साडेपाचच्या सुमारास हेलिकॉप्टर कोसळून सात जणांचा मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली. खराब हवामानामुळे हेलिकॉप्टर कोसळल्याची प्राथमिक माहिती मिळाली. या भागात गवत कापणाऱ्या महिलांनी हेलिकॉप्टर कोसळल्याची माहिती दिली. अपघाताची माहिती मिळताच बचाव पथकं घटनास्थळी रवाना झाली. दरम्यान, पुढील आदेशापर्यंत आता चारधाम यात्रेतील हेलिकॉप्टर सेवा स्थगित करण्यात आली आहे.

****

उत्तर प्रदेशच्या अमेठीच्या परिसरात आज सकाळी झालेल्या भीषण रस्ते आपघातात पाच जणांचा मृत्यू झाला आहे. तर, अन्य एक जण गंभीर जखमी झाला. अपघातग्रस्त रुग्णवाहिकेचा समोरील भाग पूर्णत: उद्ध्वस्त झाल्याचं वृत्त आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशिया या देशांच्या पाच दिवसीय दौऱ्याला आज प्रारंभ करत आहेत. पहिल्या टप्प्यातील सायप्रस भेट ही भूमध्यसागरीय प्रदेश आणि युरोपियन युनियनशी भारताचे संबंध मजबूत करण्यासाठी या भेटीमुळं फायदा होईल. दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात पंतप्रधान उद्या कॅनडात जी-सेव्हन परिषदेत सहभागी होणार आहेत. १८ जून रोजी असणाऱ्या क्रोएशियाला होणारी मोदी यांची भेट ही भारताच्या पंतप्रधानांनी या देशाला भेट देण्याची पहिलीच वेळ असणार आहे.

****

आषाढी शुद्ध एकादशी सोहळा येत्या सहा जुलै रोजी होत असून २६ जून ते दहा जुलै असा यात्रा कालावधी असेल. श्री विठ्ठल–रुक्मिणीच्या दर्शनासाठी सर्व मानाच्या आणि अन्य पालख्यांचं त्यांच्या नियोजित तिथीप्रमाणं पंढरपूरकडं प्रयाण होत आहे. त्या अनुषंगानं एकंदर व्यवस्थेबाबत राज्य सरकारतर्फे विशेष आढावा घेण्यात येत आहे. यंदाच्या आषाढी वारीसाठी मानाच्या दहा पालख्यांसोबतच्या अकराशेहून जास्त दिंड्यांना प्रती दिंडी वीस हजार रुपये याप्रमाणे अनुदान देण्याचा शासन निर्णयही काल जारी झाला आहे.

****

आदिवासी विकास विभागामार्फतही राज्यातील सर्व शासकीय आश्रमशाळांमध्ये उद्या नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात "शाळा प्रवेशोत्सव" या कार्यक्रमाद्वारे उत्साहात होणार आहे. या  दिवशी प्रत्येक शाळेत विद्यार्थ्यांचे स्वागत लोकप्रतिनिधी तसेच प्रशासकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे.

****

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट तसंच जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

****

भारताची जिमनॅस्टिकपटू प्रणति नायक हिनं दक्षिण कोरियाच्या जेचियन इथं आयोजित अशियाई कलात्मक जिमनास्टिक विजेतेपद क्रीडा स्पर्धेत महिलांच्या वॉल्ट प्रकारात काल पदक जिंकलं. अशियायी स्पर्धेत पदक कमाईची प्रणितची हे तिसरी वेळ असून याद्वारे अशिया खंडातील सर्वात यशस्वी भारतीय जिमनास्ट बनली आहे. याआधी प्रणति हिनं तुर्कीच्या अंताल्या इथं झालेल्या एफ.आय.जी. कलात्मक जिमनास्टिक उपकरण विश्वचषक स्पर्धेतही वॉल्ट प्रकारात कांस्य पदक पटकावलेलं आहे.

****

जागतिक कसोटी क्रिकेट अजिंक्यपद दक्षिण आफ्रिकेनं पटकावलं आहे. लंडन इथं झालेल्या या सामन्यात काल सामन्याच्या चौथ्या दिवशी दक्षिण अफ्रिकेनं ऑस्ट्रेलियाला पाच गड्यांनी पराभव करत विजयासाठी आवश्यक २८२ धावांचं लक्ष्य साध्य केलं. दक्षिण अफ्रिकेचा १३६ धावा करणारा फलंदाज एडन मारक्रम सामनावीर ठरला. दक्षिण आफ्रिकेकडून कॅगिसो रबाडा या जलदगती गोलंदाजानं नऊ गडी बाद केले. दक्षिण आफ्रिकेनं तब्बल २७ वर्षांनतर आय.सी.सी.च्या स्पर्धेत विजय मिळवला आहे.

****

आरोग्य विभागाच्या कायाकल्प योजनेत नांदेड जिल्ह्यानं राज्यभरातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. सन २०२४– २५ मध्ये जिल्ह्याच्या ७० पैकी ४१ म्हणजेच पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त आरोग्य केंद्रांना हा पुरस्कार मिळाल्यानं नांदेड जिल्हा या योजनेत राज्यात अव्वल ठरला.

सर्व शासकीय रुग्णालयातील आरोग्य विषयक पायाभूत सुविधा – सेवा, रुग्णालयातील स्वच्छता आणि अन्य उपक्रमांसाठी मूल्यमापनाद्वारे गुणानुक्रमे कायाकल्प पुरस्कार देण्यात येतो. या अंतर्गत, जिल्ह्यात प्रथम पुरस्कार देगलूर तालुक्यातील मरखेल प्राथमिक आरोग्य केंद्राला मिळाला असून यात दोन लाख रुपयांच्या बक्षिसांचा समावेश आहे. अन्य केंद्रांना प्रोत्साहन बक्षीसद्वारे प्रत्येकी पन्नास हजार रुपये जाहीर झाले.

****

जालना जिल्ह्याच्या वार्षिक विकास योजने अंतर्गत मंजूर पाचशे कोटी रुपयांहून जास्त निधी संबंधित विभागाच्या प्रमुखांनी वेळेत खर्च करण्याचे निर्देश पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी दिले आहेत. नियोजन समितीच्या आढावा बैठकीत त्या काल बोलत होत्या. शासकीय यंत्रणांनी प्राप्त निधीतून विकास कामे करताना लोकप्रतिनिधींशी समन्वय ठेवण्याचही मुंडे यांनी सूचित केलं. पोलीस दलाने खरेदी केलेल्या वाहनांचं लोकर्पणही पालकमंत्री मुंडे यांच्या हस्ते काल झालं.

****